महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांसाठी लागू करावयाच्या अटी निश्चित करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्रमांक : व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ सप्टेंबर, २०१२

**संदर्भ :** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक :व्हीओसी-२०१२/३३७/प्र.क्र.१६१/ व्यशि-४, दिनांक १६ जुलै, २०१२.
२) सचिव, म. रा. व्य. शि. प. मंडळ यांचे पत्र क्र: मराव्यशिपमं/का-१२/समक-पशैअ/३१२४/ २०१२, दि. ०१ सप्टेंबर, २०१२ अन्वये सादर केलेला समिती अहवाल.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक :
I) व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५/ व्यशि-४ (अ), दिनांक२८ सप्टेंबर, २०१२.
II) व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५/ व्यशि-४ (ब), दिनांक२८ सप्टेंबर, २०१२.

**प्रस्तावना :** देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये व्यवसाय शिक्षणास अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. ही काळाची गरज ओळखून राज्य शासनाने व्यवसाय शिक्षणाच्या विकासासाठी अनेक योजना सुरु करण्याचे धोरण अवलंबिलेले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात कुशल कामगार वर्गाची गरज निर्माण झालेली आहे. त्यासाठी व्यवसाय शिक्षणाचा दर्जा उंचावणे अत्यंत आवश्यक असून पर्यायाने महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांचे गुणवत्ता राखणे व उंचावणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे २ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणासाठी उच्च माध्यमिक +२ स्तरावरील अभ्यासक्रमांशी समकक्षता मिळणेसाठी आणि १ वर्ष व २ वर्ष कालावधीचे अभ्यासक्रमांना नोकरीसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील अभ्यासक्रमांशी पर्यायी शैक्षणिक अर्हता निश्चित करणेसाठी संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती व शासकीय अधिकारी यांची एक संयुक्त समिती शासनाने गठित केली होती. सदर समितीने याप्रकरणी मंडळाचे अभ्यासक्रमांची, तसेच सदर विविध स्तरावरील शिक्षण घेतलेले विद्यार्थी, त्यांचेसाठी उपलब्ध रोजगाराच्या संधी, उद्योगधंद्यांसाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ, शिक्षण घेत असतांना गळती झालेले विद्यार्थी, सेवायोजन कार्यालयातील विद्यार्थी नोंदणी तपशिल, अभ्यासक्रमांना समकक्षता तसेच पर्यायी शैक्षणिक अर्हता दिल्याने विद्यार्थ्यांना होणारे फायदे, राज्यामध्ये व देशामध्ये विविध विभागांनी समकक्षता तसेच पर्यायी शैक्षणिक अर्हता याबाबत निर्गमित केलेले आदेश, व्यवसाय शिक्षणासाठी विविध समित्यांनी केलेल्या शिफारशी, अभ्यासक्रम राबविताना संस्थांकडून पूर्तता होणेकरीता आवश्यक अटी इत्यादींबाबत सर्वंकष अभ्यासक्रम आढावा घेवून समितीने शिफारशी व आवश्यक अटीसह अहवाल शासनास सादर केलेला आहे. या अहवालामध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या गुणवत्ता राखण्यासाठी नमुद करण्यात आलेल्या अटीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांसाठी खाली नमुद केलेल्या अटी लागू करणेस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थेकडे गुणवत्ता असणे आवश्यक आहे, त्यासाठी संबंधित संस्थेस मंडळामार्फत Accrediation करून घेणे आवश्यक राहील.

२. संस्थेचे वर्षातून कमीत कमी २ वेळा मंडळामार्फत Academic Audit करण्यात यावे

३. मंडळामार्फत मान्यता दिलेल्या व भविष्यात मान्यता देण्यांत येणाऱ्या अशासकीय संस्थांनी ६ महिने, १ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमांसाठी रू. १.०० लाख प्रति अभ्यासक्रम आणि २ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमांसाठी रू.२.०० लाख प्रति अभ्यासक्रम एवढी रक्कम डिपॉझिट (अनामत) म्हणून मंडळाकडे जमा करणे आवश्यक राहील. मंडळ कार्यालयाने सदर रक्कम मंडळाच्या स्वीय प्रपंची लेखा खात्यामध्ये (PLA) जमा करावी. सदर अट मान्यता प्राप्त सर्व अशासकीय संस्थांसाठी लागू राहील. तसेच मंडळाची मान्यता असेपर्यंत सदर अनामत रक्कम मंडळाकडे राहील. मान्यता रद्द केल्यास व संस्थेकडे कोणतेही दायित्व नसल्यास अनामत रक्कम परत करण्यांत येईल.

४. संस्थेत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचे प्रवेशित विद्यार्थ्यांचे ६ महिने, १ वर्षे व २ वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमांसाठी अनुक्रमे किमान १२० दिवस, २०० दिवस आणि ४०० दिवस प्रशिक्षण होणे आवश्यक आहे.

५. संस्थेस अभ्यासक्रम चालविण्यासाठी मान्यता देण्यापूर्वी संस्थेकडे अभ्यासक्रमांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा मंडळाने निश्चित केलेल्या निकष व मानकानुसार असणे आवश्यक आहे.

६. संस्थेची प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता व निकाल यांचे मागील ३ वर्षाचे सरासरी प्रमाण कमीत कमी ६०% असणे आवश्यक राहील.

७. मंडळाच्या अभ्यासक्रमाचा दर्जा हा औद्योगिक क्षेत्रात लागणाऱ्या अद्यावत कौशल्याची निकड भागवू शकेल असा ठेवण्यात यावा. त्यासाठी अभ्यासक्रमाचा स्तर वेळोवेळी अद्यावत करण्याची जबाबदारी मंडळाची राहील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्रमांक २०१२०९२८१५०४०२२४०२ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**( चं. के. जाधव)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) आयुक्त, रोजगार स्वयंरोजगार व कौशल्य विकास, नवी मुंबई. .

२) संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मंबई - १

३) संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मंबई - १

४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / नाशिक / पुणे / अमरावती /औरंगाबाद / नागपूर (व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत)

५) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत)

६) सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, बांद्रा, मुंबई ५१

७) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव

८) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव

९) निवड नस्ती (व्यशि-४)